# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**मा. महासभा दि. ०९/०८/२०१९**

आज शुक्रवार दि. ०९/०८/२०१९ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ०२ दि. ०१/०८/२०१९ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

<u>उपस्थित सदस्य</u>

| | | |
|---|---|---|
| **१)** | **डिम्पल विनोद मेहता** | **महापौर** |
| **२)** | **चंद्रकांत सिताराम वैती** | **उपमहापौर** |
| **३)** | **पाटील रोहिदास शंकर** | **सभागृह नेता** |
| **४)** | **भोईर सुनिता शशिकांत** | **सदस्या** |
| **५)** | **शाह रिटा सुभाष** | **सदस्या** |
| **६)** | **तिवारी अशोक सूर्यदेव** | **सदस्य** |
| **७)** | **पांडेय पंकज सूर्यमणि** | **सदस्य** |
| **८)** | **गोहिल शानू जोरावर सिंह** | **सदस्या** |
| **९)** | **कांगणे मीना यशवंत** | **सदस्या** |
| **१०)** | **सिंह मदन उदितनारायण** | **सदस्य** |
| **११)** | **शेट्टी गणेश गोपाळ** | **सदस्य** |
| **१२)** | **ढवण निलम हरीश्चंद्र** | **सदस्या** |
| **१३)** | **नलावडे दिनेश दगडु** | **सदस्य** |
| **१४)** | **भोईर गणेश गजानन** | **सदस्य** |
| **१५)** | **पाटील प्रभात प्रकाश** | **सदस्या** |
| **१६)** | **गुप्ता कुसुम संतोष** | **सदस्या** |
| **१७)** | **पाटील धनेश परशुराम** | **सदस्य** |
| **१८)** | **पाटील वंदना मंगेश** | **सदस्या** |
| **१९)** | **शाह राकेश रतिशचंद्र** | **सदस्य** |
| **२०)** | **जैन सुनिता रमेश** | **सदस्या** |
| **२१)** | **रॉड्रीकस मोरस जोसेफ** | **सदस्य** |
| **२२)** | **मोकाशी दिपाली आनंदराव** | **सदस्या** |
| **२३)** | **परेरा कॅटलीन एन्थोनी** | **सदस्या** |
| **२४)** | **रकवी वैशाली गजेंद्र** | **सदस्य** |
| **२५)** | **खंडेलवाल सुरेश जगदीश** | **सदस्य** |
| **२६)** | **परदेशी गिता हरीश** | **सदस्या** |
| **२७)** | **पाटील नरेश तुकाराम** | **सदस्य** |
| **२८)** | **शेख अमजद गफार** | **सदस्य** |
| **२९)** | **पाटील जयंतीलाल गुरूनाथ** | **सदस्य** |
| **३०)** | **घरत तारा विनायक** | **सदस्या** |
| **३१)** | **पांडे स्नेहा शैलेश** | **सदस्या** |
| **३२)** | **शिर्के अनंत गेणू** | **सदस्य** |

| | | |
|---|---|---|
| ३३) | पाटील वंदना विकास | सदस्या |
| ३४) | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | सदस्या |
| ३५) | गेहलोत हसमुख मोहनलाल | सदस्य |
| ३६) | थेराडे संजय अनंत | सदस्य |
| ३७) | मुखर्जी अनिता बबलू | सदस्या |
| ३८) | म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| ३९) | सोनार सुरेखा प्रकाश | सदस्या |
| ४०) | भोईर विणा सुर्यकांत | सदस्या |
| ४१) | भोईर कमलेश यशवंत | सदस्य |
| ४२) | पाटील अनिता जयवंत | सदस्या |
| ४३) | म्हात्रे परशुराम पदमाकर | सदस्य |
| ४४) | मांजरेकर आनंद दत्ताराम | सदस्य |
| ४५) | अरोरा दीपिका पंकज | सदस्या |
| ४६) | बेलानी हेमा राजेश | सदस्या |
| ४७) | दळवी प्रशांत ज्ञानदेव | सदस्य |
| ४८) | गजरे दौलत तुकाराम | सदस्य |
| ४९) | नाईक विविता विवेक | सदस्या |
| ५०) | राय विजयकुमार सिस्थन नारायण | सदस्य |
| ५१) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ५२) | सावंत अनिल दिवाकर | सदस्य |
| ५३) | मेहरा राजीव ओमप्रकाश | सदस्य |
| ५४) | परमार हेतल रतिलाल | सदस्या |
| ५५) | भट दीप्ती शेखर | सदस्या |
| ५६) | कासोदारिया अश्विन शामजीभाई | सदस्य |
| ५७) | जैन दिनेश तेजराज | सदस्य |
| ५८) | भावसार वंदना संजय | सदस्या |
| ५९) | शाह सीमाबेन कमलेश | सदस्या |
| ६०) | दुबे मनोज रामनारायण | सदस्य |
| ६१) | विराणी अनिल रावजीभाई | सदस्य |
| ६२) | अहमद साराह अकरम | सदस्या |
| ६३) | इनामदार जुबेर अब्दुल्ला | सदस्य |
| ६४) | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम | सदस्य |
| ६५) | भोईर जयेश भानुदास | सदस्य |
| ६६) | भानुशाली वर्षा गिरधर | सदस्या |
| ६७) | म्हात्रे विनोद काशिनाथ | सदस्य |
| ६८) | बांड्या एलायस दुमिंग | सदस्य |

**<u>गैरहजर सदस्य -</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | व्यास रवि वासुदेव | सभापती, स्थायी समिती |
| २) | पाटील प्रविण मोरेश्वर | विरोधी पक्षनेता |
| ३) | कदम अर्चना अरुण | सदस्या |
| ४) | रावल मेघना दिपक | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| **५)** | **सिंग श्रीप्रकाश जिलेदार** | **सदस्य** |
| **६)** | **धृवकिशोर मन्साराम पाटील** | **सदस्य** |
| **७)** | **जैन गीता भरत** | **सदस्या** |
| **८)** | **जैन राजेंद्र भवरलाल** | **सदस्य** |
| **९)** | **भूप्ताणी रक्षा सतीश (शाह)** | **सदस्या** |
| **१०)** | **अग्रवाल सुशील गोपीकिशन** | **सदस्य** |
| **११)** | **सय्यद नुरजाहॉ नाझर हुसेन** | **सदस्या** |
| **१२)** | **आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र** | **सदस्य** |
| **१३)** | **पाटील संध्या प्रफुल्ल** | **सदस्या** |
| **१४)** | **शेट्टी अरविंद आनंद** | **सदस्य** |
| **१५)** | **शिंदे रुपाली वसंत (मोदी)** | **सदस्या** |
| **१६)** | **हसनाळे ज्योत्सना जालींदर** | **सदस्या** |
| **१७)** | **पारधी सुजाता यशवंत** | **सदस्या** |
| **१८)** | **म्हात्रे सचिन केसरीनाथ** | **सदस्य** |
| **१९)** | **यादव मिरादेवी रामलाल** | **सदस्या** |
| **२०)** | **भोईर भावना राजू** | **सदस्या** |
| **२१)** | **भोईर राजू यशवंत** | **सदस्य** |
| **२२)** | **सोंस नीला बर्नाड** | **सदस्या** |
| **२३)** | **शेख रुबीना फिरोझ** | **सदस्या** |
| **२४)** | **म्हात्रे नयना गजानन** | **सदस्या** |
| **२५)** | **गोविंद हेलन जॉर्जी** | **सदस्या** |
| **२६)** | **बगाजी शर्मिला विन्सन्ट** | **सदस्या** |

**<u>रजेचा अर्ज -</u>**

| | | |
|---|---|---|
| **१)** | **सपार उमा विश्वनाथ** | **सदस्या** |

मा. महापौर :-

सचिवांनी सभेला सुरुवात करावी.

नगरसचिव :-

**मिरा भाईंदर महानगपालिकेची मा. महासभा शुक्रवार दि. ०९/०८/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका , स्व. इंदिरा गांधी भवन , मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र . ०२ मधील प्रकरणांवर विचार विनि मय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे.** प्रशासनाकडून २ के खाली एक प्रस्ताव आला आहे. बारवी धरण प्रकल्प बाधितांना पाण्याच्या वापराच्या समन्यायी पध्दतीने मिरा भाईंदर महापालिकेच्या आस्थापनेवर नेमणूक करणे बाबत. ह्या प्रस्तावाला सभागृहाची मान्यता आहे का? सभागृहाची मान्यता असल्यामुळे हा विषय सर्वांत शेवटी घेण्यात येईल.

रोहिदास पाटील :-

**भारताच्या पहिल्या माजी परराष्ट्र मंत्री सुषमा स्वराज यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने मंगळवार दि.06/08/2019 रोजी निधन झाले आहे. त्या ६७ वर्षांच्या होत्या. सुषमा स्वराज यांच्या निधनाने एका मितभाषी आणि तितक्याच कणखर नेतृत्वाला देश मुकला आहे**

**१४ फेब्रुवारी १९५२ रोजी हरियाणातील अंबाला कॅन्टोन्मेंट येथे हरदेव शर्मा आणि श्रीमती लक्ष्मी देवी यांच्या पोटी श्रीम . सुषमा स्वराज (पूर्वाश्रमीच्या शर्मा) यांचा जन्म झाला. त्यांचे वडील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे एक प्रमुख सदस्य होते . सुषमा स्वराज यांचे शिक्षण अंबाला छावणीतील सनातन धर्म महाविद्यालयात झाले असून संस्कृत व राज्यशास्त्रातून पदवी प्राप्त केली. त्यांनी पंजाब विद्यापीठ ,**

**चंदीगड येथे कायद्याचा अभ्यास केला . चार दशकांहून अधिक काळ राजकारणात सक्रिय असलेल्या स्व . सुषमा स्वराज यांनी अनेक महत्त्वपूर्ण पद भूषवली होती.**

**स्व. सुषमा स्वराज या सोशल मीडियावर फार सक्रिय होत्या . सोशल मीडियाचा योग्य आणि प्रभावीपणे वापर केला तर तो सामान्य नागरिक आणि प्रशासनाच्या किती फायद्याचा ठरू शकतो , हे सुषमाजींनी दाखवून दिलं. फेब्रुवारी 2015 मध्ये बसरामध्ये ओलीस ठेवण्यात आलेल्या 168 नागरिकांचा व्हीडिओ ट्विटरवरून त्यांच्यासोबत शेअर करण्यात आला . या व्हीडिओच्या आधारे तातडीने कारवाई करत त्यांनी या भारतीय नागरिकांची सुटका तर केलीच पण ट्विटरवरून याविषयीची माहितीही सर्वांना दिली . ट्विटरच्या माध्यमातून त्यांनी केलेलं हे पहिलं मोठं रेस्क्यू ऑपरेशन होतं . त्यांच्या या 'ट्विटर सेव्ही' पणामुळेच परराष्ट्र मंत्रालय सामान्य नागरिकांसाठी खासकरून अडचणीत सापडलेल्या भारतीयांसाठी अगदी एका क्लिकवर आलं. अडचणीत असलेल्या कोणीही सुषमाजींना ट्विट केलं की त्यांना उत्तर तर मिळायचंच पण अनेकदा तिथल्या तिथे , अगदी ट्विटरवरच त्या आपल्या सहकाऱ्यांना पावलं उचलण्यासाठी सूचनाही द्यायच्या. फिरायला गेल्यावर पास पोर्ट हरवलेल्या अनेकांना सुषमांनी मदत तर केलीच . पण ट्विटरचा वापर करत त्यांनी गंभीर अडचणीत असलेल्या अनेकांना सुखरूप मायदेशी आणलं.**

**जम्मू-काश्मीरला कलम ३७० च्या जोखाडातून मुक्त करण्याचा निर्णय घेतल्याबद्दल तसेच जम्मू - काश्मीरचं विभाजन करणारं विधेयक संसेदत मंजू र करून घेण्याची ऐतिहासिक कामगिरी केल्याबद्दल स्व . सुषमा स्वराज यांनी ट्विट करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे अभिनंदन केले होते . 'मैं अपने जीवन में इस दिन को देखने की प्रतीक्षा कर रही थी ' अशा भावनाही सुषमा यांनी या ट्विटच्या माध्यमातून व्यक्त केल्या होत्या. या ट्विटनंतर काही तासांतच त्यांची प्राणज्योत मालवली**

**माजी परराष्ट्र मंत्री सुषमा स्वराज यांनी देशासाठी केलेल्या कामांसाठी त्या सदैव स्मरणात राहतील त्यांच्या निधनाने भारतीय राजकारणातील गौरवशाली पर्वाचा व ओजस्वी वाणीचा अस्त झाला आहे अशा त्यांच्या पवित्र आत्म्यास चिर:शांती लाभो.**

**निलम ढवण :-**

स्व. सुषमा स्वराज ह्यांच्याबद्दल आता माहिती दिली गेली आणि ह्यापूर्वी देखील सर्वांना त्यांच्याबद्दल त्यांच परखड आणि राष्ट्रीय कारकिर्द कशी असावी ह्या कार्यकर्ता म्हणून तळागाळातल्या लोकांची ते ट्विटरवर किंवा फोनवर आलेल्या तक्रारीची दखल कशी घ्यावी हा एक आदर्श आपल्याला त्यांच्याकडून मिळतो आणि खरोखरच एक अत्यंत चांगले कामकाज वयाच्या २५ वर्षापासून आतापर्यंत त्यांचे जे व्यक्तिमत्व आहे ते एक महिला म्हणून अत्यंत आदर्शवादी आम्ही आजपर्यंत त्याच्याकडे बघत होतो आणि भविष्यात देखील त्यांचा आदर्श आमच्यासमोर राहणार आहे. मी शिवसेनेच्या वतीने स्व. सुषमा स्वराज ह्यांना भावपूर्ण आदरांजली वाहते.

**जुबेर इनामदार :-**

भारतीय जनता पक्षाच्या जेष्ठ नेत्या तथा भारत देशाच्या माजी परराष्ट्र मंत्री श्रीम. स्व. सुषमा स्वराज ह्यांचे हृदय विकाराने दुःखद निधन झाले. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या वतीने मी आदरांजली अर्पित करीत आहे. सर्वांच्या वतीने श्रध्दांजली.

**वर्षा भानुशाली :-**

श्रीम. सुषमा स्वराज ह्यांना श्रध्दांजली. सुषमा दिदी अचानक चले जाना अविश्वसनीय है। दिदी आप सुमधुर वाणी की मलिका का और आजस्विनी व्यक्ती की धनी थी। आप संसद रत्न थी, आप महिलाओं की आन बान और शान थी। आप भारतीय संस्कृती की परिचय थी। आपके जीवन का क्षण शरीर का कणकण राष्ट्रीय निर्माण और सेवाओ का समर्पित था। आपका विधन व्यक्तित्व सर्मपण हमको मार्गदर्शन का प्रेरणादायी करता रहेगा। अखंड भारत का सबका श्रेय भारतीय राजनिती से अहम किरदार निभाते हुए आज आपकी मनोकामना पूर्ण होने के बाद प्राण त्यागने वाली महान महिला सुषमा स्वराज को अश्रूभरी श्रध्दांजली।

**अनिल सावंत :-**

भारतीय जनता पक्षाच्या जेष्ठ नेत्या तथा भारत देशाच्या माजी परराष्ट्र मंत्री श्रीम. स्व. सुषमा स्वराज ह्यांचे हृदय विकाराने दुःखद निधन झाले त्यांचा शोकप्रस्ताव मांडत आहे तसेच सन १९९८ ते २०१३ दरम्यान सलग ३ वेळा राजधानी दिल्लीच्या मुख्यमंत्री पद भुषविणाऱ्या काँग्रेसच्या जेष्ठ नेत्या शिला दिक्षीत यांचे वयाच्या ८१ व्या वर्षी दि. २७/०७/२०१९ रोजी दुखःद निधन झाले. मनमिळाऊ स्वभावाच्या

दिक्षीत यांचे पक्ष सीमा ओलांडून राजकीय वर्तुळात असंख्य चाहते होते. दिल्लीकरांसाठी त्यांनी पायाभूत सुविधांचे जाळे विणले. मेट्रो प्रकल्प, ७० हून अधिक उड्डाणपुलांची निनिर्मती लंडनच्या धर्तीवर गडद लाल रंगाच्या बसेसमुळे त्यांनी दिल्लीकरांच्या मनात घर केले त्यांना या सभागृहातर्फे श्रध्दांजली. तसेच गेल्या ४० वर्षापासून अधिक काळ ग्रामीण भागातील विद्यार्थी व महिलांसाठी सर्वस्व देऊन झटणा-या जेष्ठ सामाजिक कार्यकर्त्या निर्मला पुरंदरे यांचे दि. २७/०७/२०१९ रोजी दुखःद निधन झाले. शिवशाहिर बाबासाहेब पुरंदरे यांच्या त्या पत्नी होत्या. त्यांच्या माध्यमातून महाराष्ट्रामध्ये २५० बालवाडी शाळांची निर्मिती झाली. सुमारे ११ हजाराहून अधिक बालवाडी शिक्षकांना त्यांच्या संस्थेने घडविले. ग्रामीण भागातील त्यांचे कार्य अतुलनीय होते. त्यांना या सभागृहातर्फे श्रध्दांजली.

**दु:खवठा ठराव क्र. ३५ :-**

**भारताच्या पहिल्या माजी परराष्ट्र मंत्री सुषमा स्वराज यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने मंगळवार दि.06/08/2019 रोजी निधन झाले आहे. त्या ६७ वर्षांच्या होत्या. सुषमा स्वराज यांच्या निधनाने एका मितभाषी आणि तितक्याच कणखर नेतृत्वाला देश मुकला आहे**

**१४ फेब्रुवारी १९५२ रोजी हरियाणातील अंबाला कॅन्टोन्मेंट येथे हरदेव शर्मा आणि श्रीमती लक्ष्मी देवी यांच्या पोटी श्रीम . सुषमा स्वराज (पूर्वाश्रमीच्या शर्मा) यांचा जन्म झाला. त्यांचे वडील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे एक प्रमुख सदस्य होते . सुषमा स्वराज यांचे शिक्षण अंबाला छावणीतील सनातन धर्म महाविद्यालयात झाले असून संस्कृत व राज्यशास्त्रातून पदवी प्राप्त केली . त्यांनी पंजाब विद्यापीठ , चंदीगड येथे कायद्याचा अभ्यास केला . चार दशकांहून अधिक काळ राजकारणात सक्रिय असलेल्या स्व . सुषमा स्वराज यांनी अनेक महत्त्वपूर्ण पद भूषवली होती**

**स्व. सुषमा स्वराज या सोशल मीडियावर फार सक्रिय होत्या . सोशल मीडियाचा योग्य आणि प्रभावीपणे वापर केला तर तो सामान्य नागरिक आणि प्रशासनाच्या किती फायद्याचा ठरू शक तो, हे सुषमाजींनी दाखवून दिलं. फेब्रुवारी 2015 मध्ये बसरामध्ये ओलीस ठेवण्यात आलेल्या 168 नागरिकांचा व्हीडिओ ट्विटरवरून त्यांच्यासोबत शेअर करण्यात आला . या व्हीडिओच्या आधारे तातडीने कारवाई करत त्यांनी या भारतीय नागरिकांची सुटका तर केलीच पण ट्विटरवरून याविषयी ची माहितीही सर्वांना दिली . ट्विटरच्या माध्यमातून त्यांनी केलेलं हे पहिलं मोठं रेस्क्यू ऑपरेशन होतं . त्यांच्या या 'ट्विटर सेव्ही' पणामुळेच परराष्ट्र मंत्रालय सामान्य नागरिकांसाठी खासकरून अडचणीत सापडलेल्या भारतीयांसाठी अगदी एका क्लिकवर आलं. अडचणीत असलेल्या कोणीही सुषमाजींना ट्विट केलं की त्यांना उत्तर तर मिळायचंच पण अनेकदा तिथल्या तिथे , अगदी ट्विटरवरच त्या आपल्या सहकाऱ्यांना पावलं उचलण्यासाठी सूचनाही द्यायच्या. फिरायला गेल्यावर पासपोर्ट हरवलेल्या अनेकांना सुषमांनी मदत तर केलीच . पण ट्विटरचा वापर करत त्यांनी गंभीर अडचणीत असलेल्या अनेकांना सुखरूप मायदेशी आणलं.**

**जम्मू-काश्मीरला कलम ३७० च्या जोखाडातून मुक्त करण्याचा निर्णय घेतल्याबद्दल तसेच जम्मू - काश्मीरचं विभाजन करणारं विधेयक संसेदत मंजूर करून घेण्याची ऐतिहासिक कामगिरी केल्याबद्दल स्व . सुषमा स्वराज यांनी ट्विट करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे अभिनंदन केले होते . 'मैं अपने जीवन में इस दिन को देखने की प्रतीक्षा कर रही थी ' अशा भावनाही सुषमा यांनी या ट्विटच्या माध्यमातून व्यक्त केल्या होत्या. या ट्विटनंतर काही तासांतच त्यांची प्राणज्योत मालवली**

**माजी परराष्ट्र मंत्री सुषमा स्वराज यांनी देशासाठी केलेल्या कामांसाठी त्या सदैव स्मरणात राहतील त्यांच्या निधनाने भारतीय राजकारणातील गौरवशाली पर्वाचा व ओजस्वी वाणीचा अस्त झाला आहे अशा त्यांच्या पवित्र आत्म्यास चिर :शांती लाभो .**

तसेच सन १९९८ ते २०१३ दरम्यान सलग ३ वेळा राजधानी दिल्लीच्या मुख्यमंत्री पद भुषविणा-या कॉंग्रेसच्या जेष्ठ नेत्या शिला दिक्षीत यांचे वयाच्या ८१ व्या वर्षी दि. २७/०७/२०१९ रोजी दुखःद निधन झाले. मनमिळाऊ स्वभावाच्या दिक्षीत यांचे पक्ष सीमा ओलांडून राजकीय वर्तुळात असंख्य चाहते होते. दिल्लीकरांसाठी त्यांनी पायाभूत सुविधांचे जाळे विणले. मेट्रो प्रकल्प, ७० हून अधिक उड्डाणपुलांची निनिर्मती लंडनच्या धर्तीवर गडद लाल रंगाच्या बसेसमुळे त्यांनी दिल्लीकरांच्या मनात घर केले त्यांना या सभागृहातर्फे श्रध्दांजली.

तसेच गेल्या ४० वर्षापासून अधिक काळ ग्रामीण भागातील विद्यार्थी व महिलांसाठी सर्वस्व देऊन झटणा-या जेष्ठ सामाजिक कार्यकर्त्या निर्मला पुरंदरे यांचे दि. २७/०७/२०१९ रोजी दुखःद निधन झाले.

शिवशाहिर बाबासाहेब पुरंदरे यांच्या त्या पत्नी होत्या. त्यांच्या माध्यमातून महाराष्ट्रामध्ये २५० बालवाडी शाळांची निर्मिती झाली. सुमारे ११ हजाराहून अधिक बालवाडी शिक्षकांना त्यांच्या संस्थेने घडविले. ग्रामीण भागातील त्यांचे कार्य अतुलनीय होते. त्यांना या सभागृहातर्फे श्रध्दांजली.

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील अनुमोदक :- श्री. अनिल सावंत**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रभात पाटील :-**

भारताच्या पहिल्या परराष्ट्र मंत्री स्व. सुषमा स्वराज यांचे ह्दयविकाराच्या तीव्र झटक्याने मंगळवार दि. ०६/०८/२०१९ रोजी निधन झाले असून त्यांना श्रध्दांजली वाहून आजची मा. महासभा तहकुब करण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**निलम ढवण :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर मॅडम सभा तहकूब झाली. आपल्याला श्रध्दांजली वाहायची आहे. मात्र १३ तारखेला आमची ईद असणार १२,१३,१४ तीन दिवस ईद साजरी केली जाते. तीन दिवस ईद साजरी करतात. त्याची तुम्हाला जाणीव आहे. तर आपण ही सभा १५ ऑगस्ट नंतर आयोजित करावी अशी विनंती आहे.

**साराह अकरम :-**

मॅडम तीन दिवस आमचा सण आहे. त्यानंतर ठरवा.

**मा. महापौर :-**

तारीख नंतर कळवण्यात येईल.

**वर्षा भानुशाली :-**

मा. आयुक्त साहेब माझी विनंती आहे.

**मा. उपमहापौर :-**

१३ तारखेऐवजी आपण पुढील तारीख नंतर कळवू.

**सभा तहकुबी ठराव क्र. ३६ :-**

भारताच्या पहिल्या परराष्ट्र मंत्री स्व. सुषमा स्वराज यांचे ह्दयविकाराच्या तीव्र झटक्याने मंगळवार दि. ०६/०८/२०१९ रोजी निधन झाले असून त्यांना श्रध्दांजली वाहून आजची मा. महासभा तहकुब करण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- सौ. प्रभात पाटील अनुमोदक :- सौ. निलम ढवण**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

श्रध्दांजलीसाठी सर्वांनी दोन मिनिट जागेवर उभे रहायचे आहे.

**(सभा संपण्याची वेळ स. ११.३५ वाजता)**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका